# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२३-२४/३३५
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२३-२४ मधील

## दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची एकोणीसावी सभा शनिवार दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२४ दुपारी २:०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | अनुपस्थित |
| ६ | प्रा. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | सचिव, उच्च शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | सदस्य | अनुपस्थित |
| ११ | डॉ. बळीराम गायकवाड (प्रभारी कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | प्रा. (सी.ए.) डॉ. रवींद्र प्रभाकर बांबर्डेकर ( प्रभारी वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. प्रसाद कारंडे (प्रभारी संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून मा.अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विंनती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करून सभेची

कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली. कुलसचिवानी मुंबई विद्यापीठाचे नवीन प्रभारी वित्त व लेखा अधिकारी प्रा. (सी.ए.) डॉ. रवींद्र प्रभाकर बांबर्डेकर यांचे सभागृहात स्वागत केले.

**श्रद्धांजली**

**चंद्रकांत कोळी**

ज्येष्ठ गायक- अभिनेते चंद्रकांत कोळी यांचे दिनांक १७ जानेवारी, २०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षाचे होते.

**श्रीकांत सरमळकर**

माजी आमदार श्रीकांत सरमळकर यांचे दिनांक २२ जानेवारी, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले.

**रामचंद्र व्यकंटेश जोशी**

ज्येष्ठ लेखक रामचंद्र व्यकंटेश उर्फ रा. व्यं. जोशी यांचे दिनांक २३ जानेवारी, २०२४ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते १०३ वर्षाचे होते.

**प्रभाकर देवधर**

इलेकट्रोनिक आयोगाचे माजी अध्यक्ष देवधर 'एप्लैब इंडिया' या विख्यात कंपनीचे संस्थापक- प्रवर्तक प्रभाकर देवधर यांचे दिनांक २३ जानेवारी, २०२४ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ८९ वर्षाचे होते.

**रामकृष्ण नायक**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण नायक यांचे दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यू समयी ते ९४ वर्षाचे होते.

**विजय कुलकर्णी**

प्रसिद्ध चित्रकार विजय कुलकर्णी यांचे दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७३ वर्षाचे होते.

**अनिल बाबर**

खानापूर- आटपाडीचे आमदार बाबर यांचे दिनांक ३१ जानेवारी, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ७३ वर्षाचे होते.

**विजयकांत**

देसिया मुरपोक्कु द्रविड़ कलगम (डीएमडीके) संस्थापक आणि लोकप्रिय तामिळ अभिनेते विजयकांत यांचे दिनांक २८ डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षाचे होते.

## पंडित भवानी शंकर

ज्येष्ठ पखवाज वादक पंडित भवानी शंकर यांचे दिनांक ३० डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षाचे होते.

## तुकाराम मिरजकर

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व नामदेव समाजोन्नती परिषदेचे मुख्य विश्वस्त तुकाराम पांडुरंग मिरजकर यांचे दिनांक ३० डिसेंबर, २०२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ९४ वर्षाचे होते.

## राशिद खान

प्रख्यात हिंदुस्थानी शास्त्रीय गायक राशिद खान यांचे दिनांक ९ जानेवारी, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी ते ५५ वर्षाचे होते.

## सुनंदा पटवर्धन

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, प्रगती प्रतिष्ठान संस्थेच्या संस्थापिका सुनंदा पटवर्धन यांचे दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षाच्या होत्या.

## मुन्नवर राणा

प्रख्यात शायर-गझलकार मुन्नवर राणा यांचे दिनांक १५ जानेवारी, २२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त ७१ वर्षाचे होते.

## डॉ. प्रभा अत्रे

ज्येष्ठ गायिका स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांचे दिनांक १६ जानेवारी, २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षाचे होते.

वरील सर्व मान्यवरांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करून सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

**अभिनंदनाचा ठराव**

मा. कुलगुरूनी खालील प्रमाणे अभिनंदनाचा ठराव सादर केला.

१) मुंबई विद्यापीठाचे माजी विद्यार्थी व वरिष्ठ भाजपा नेता श्री. लालकृष्ण आडवाणी यांना भारत रत्न पुरस्कार मिळाला आहे

२) मल्लखांब या क्रीडा प्रकाराला जागतिक पातळीवर नेणारे श्री. उदय देशपांडे यांना पदमश्री पुरस्कार मिळाला आहे.

३) अंजुमन इस्लाम या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष श्री. जहिर काझी यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी पदमश्री पुरस्कार मिळाला आहे.

४) श्री. दत्तात्रय अंबादास मायाळू (राजदत्त) प्रसिद्ध दिग्दर्शक यांना त्यांच्या कार्यासाठी पुरस्कार मिळाला आहे.

५) महाराष्ट्रचे माजी राज्यपाल श्री. राम नाईक यांना देखील त्यांच्या कार्यासाठी पदम भूषण पुरस्काराने सम्मानित करण्यात आले. असे व्यवस्थापन परिषदेस अवगत केले.

सर्व परिषदेच्या उपस्थित सर्व सदस्यांनी ठरावास अनुमोदन दिले.

| **बाब क्र.** | **व्यवस्थापन परिषदेची बाब** | **विभाग** |
|---|---|---|
| १ | दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले.<br>तसेच दिनांक: ०४ जुलै २०२२ च्या व्यवस्थापन परिषदे मधील बाब क्रमांक ६ चा ठराव खालील प्रमाणे आहे.<br>युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार पी.एच.डी. प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ (PET) एकलव्य या कंपनीमार्फत घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.<br>**च्या ऐवजी असे वाचावे**<br>युजीसी २०१६ च्या नियमावलीनुसार पी.एच.डी. प्रवेश पूर्व परीक्षा २०२२ (PET) **Splashgain Technologies Pvt. Ltd.** मार्फत घेण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |

<table>
<tr><td>२</td><td>व्यवस्थापन परिषद दिनांक १६ जानेवारी २०२३, १० फेब्रुवारी, २३ फेब्रुवारी २०२३, ८ मार्च २०२३, २१ मार्च २०२३, २२ एप्रिल २०२३,२७ एप्रिल २०२३, १७ मे २०२३, ७ जून २०२३, २७ जून २०२३, १५ जुलै २०२३, १७ जून,२७ जुलै २०२३, १७ ऑगस्ट २०२३, १९ ऑगस्ट २०२३,१८ सप्टेंबर २०२३ आणि ८ ऑक्टोबर २०२३, १२ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर.</td><td>कार्यकारी प्राधिकरणे विभाग</td></tr>
<tr><td>ठराव</td><td>व्यवस्थापन परिषद दिनांक १६ जानेवारी २०२३, १० फेब्रुवारी, २३ फेब्रुवारी २०२३, ८ मार्च २०२३, २१ मार्च २०२३, २२ एप्रिल २०२३,२७ एप्रिल २०२३, १७ मे २०२३, ७ जून २०२३, १७ जून, २७ जून २०२३, १५ जुलै २०२३, २७ जुलै २०२३, १७ ऑगस्ट २०२३, १९ ऑगस्ट २०२३, १२ सप्टेंबर, १८ सप्टेंबर २०२३ आणि ८ ऑक्टोबर २०२३, १२ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आले.</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>Approval for UM-GICED new Programme syllabus as per NEP format commencing from Academic Year 2023-24</td><td>GICED</td></tr>
<tr><td>ठराव</td><td>It was resolved that the recommendations made by the Academic Council for approval of following new syllabus as per NEP format is accepted with effect from Academic year 2023-24.
<table>
<tr><td>Sr. No.</td><td>Course Name</td><td>Sr. No.</td><td>Course Name</td></tr>
<tr><td colspan="4">Master Programme</td></tr>
<tr><td>1</td><td>M.Sc. (Clinical Psychology)</td><td>6</td><td>Master in Fashion Management</td></tr>
<tr><td>2</td><td>M.Sc. (Biomedical Instrumentation )</td><td>7</td><td>Master in Interior Design</td></tr>
<tr><td>3</td><td>Master of Sports Science</td><td>8</td><td>B.I.D.M.I.D. (5 Years Integrated)</td></tr>
<tr><td>4</td><td>M.A. (Global Event Management, Marketing & Communication)</td><td>9</td><td>M.Des. (Fashion)</td></tr>
<tr><td>5</td><td>M.A. (Disaster, Fire and Industrial Safety Management )</td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="4">PG Programme</td></tr>
</table></td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | 1 PG Diploma in Equity Research<br>**UG Programme**<br>1 B.Sc. (Psychological Health & Behavioural Science) — 4 B.B.A. (Hons.) (Global Event Mangement, Marketing & Communication)<br>2 B.Sc. (Fitness) — 5 Bachelor of Sports Science<br>3 B.Sc. (AI&ML) — 6 BCA (Fintech) | |
| ४ | सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय ) अधिवेशन विधानपरिषद आश्वासन क्र. ५९ व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जुलै २०२१ रोजीच्या बाब क्र. ११ नुसार ठेवला असता पारित झालेल्या ठरावा मध्ये दिनांक ९ जुलै, २०२१ रोजी प्राप्त झालेल्या विधानपरिषद आश्वासन क्र. १६ समाविष्ट करण्याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पीय ) अधिवेशन विधानपरिषद आश्वासन क्र. ५९ व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २९ जुलै २०२१ रोजीच्या बाब क्र. ११ नुसार ठेवला असता पारित झालेल्या ठरावा मध्ये दिनांक ९ जुलै, २०२१ रोजी प्राप्त झालेल्या विधानपरिषद आश्वासन क्र. १६ समाविष्ट करण्याबाबत मान्यता देण्यात आली. | |
| ५ | अध्यक्ष, अंजुमन हिमायतुल इस्लाम सिनियर कॉलेज , महाड एस.टी. स्टॅन्ड समोर, महाड, जि. रायगड - ४०२ ३०१ या संस्थेचे पत्र क्र. १३/२०२३-२४ दिनांक ०२ ऑगस्ट, २०२३ अन्वये अंजुमन हिमायतुल इस्लाम सिनियर कॉलेज च्या ऐवजीं अंजुमन हिमायतुल इस्लाम संचालित बशीर एम. हजवानी सिनियर कॉलेज, महाड असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | असा ठराव पारित करण्यात आला कि, "अंजुमन हिमायतुल इस्लाम सिनियर कॉलेज" च्या ऐवजी **"अंजुमन हिमायतुल इस्लाम संचालित बशीर एम. हजवानी सिनियर कॉलेज, महाड"** असा महाविद्यालयाच्या नावात बदल करण्यास खालील अटीवर मान्यता देण्यात आली..<br>१) नावात बदल करण्यासाठी २५,०००/- (पंचवीस हजार रुपये फक्त) शुल्क घेण्यात यावे.<br>२) एल. आय. सी. निकष लागू करणे.<br>३) स्पोर्ट डिटेन्शन शुल्क, अफिलेशन शुल्क व इतर शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>४) प्राचार्य, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना नियमित पगार दिल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे. | |

| | | |
|---|---|---|
| | ५) महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन करून घेण्याचे हमीपत्र घेण्यात यावे.<br>६) सी.डी.सी., यु.डब्लू.डी.सी., आय.सी.सी. स्टुडन्ट कौंसिल सेल स्थापन केल्याबद्दल माहिती/पूर्तता घेण्यात यावी.<br>७) विद्यापीठाची संबंधित सर्व शुल्क/ थकबाकी जमा झाल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे .<br>८) रिसर्च सेंटर व तत्सम संबंधी शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>९) अकॅडमिक ऑडिट पोर्टल वर नोंदणी केल्याचे २०२३-२४ पर्यंत प्रमाणपत्र घेण्यात यावे.<br>महाविद्यालयाने उपरोक्त अटीची पूर्तता केल्यानंतरच सदर प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा. | |
| ६ | विद्यापीठाच्या वेगवेगळ्या परिसरामध्ये अकरा ठिकाणी वाहनचालका अभावी बंद अवस्थेत पडून असलेल्या वाहनांवर रोजंदारी तत्वावर रुपये ४००/- प्रति दिन मध्ये कोणीही वाहनचालक मिळत नसल्याने रोजंदारी तत्वावर वाहन चालक नेमल्यास त्यांना प्रति दिन किती वेतन देण्यात यावे याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | सदर बाब वित्त व लेखा समिती पुढे सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. | |
| ७ | विद्यापीठाच्या कनिष्ठ टंकलिपिक पदावरून कनिष्ठ ग्रंथालय सहायक पदावर तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱयांच्या संदर्भात ठोस निर्णय घेण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ८ | विद्यापीठाच्या कनिष्ठ लघुलेखक या पदावर तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात ठोस निर्णय घेण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | याबाबत असा ठराव करण्यात आला कि बाब क्र. ७ व बाब क्र. ८ एकत्र करण्यात यावी. यासमस्यांचे निराकरन करण्यासाठी समिती गठीत करण्यात यावी. समिती सदस्यांचे नाम निर्देशित करण्याचे अधिकारी मा. कुलगुरूंना देण्यात आले. | |
| ९ | विद्यापीठाच्या विविध विभाग / संस्था येथे कार्यरत असलेल्या विनाअनुदानित / स्वयंअर्थसहाय्यीत शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नतीतील वेतनश्रेणी व वित्तीय भार विचारार्थ व निर्णयासाठी सादर. | शैक्षणिक नेमणूक व गुणवत्ता हमी |
| ठराव | सदर बाब मागे घेण्यात आली. | |
| १० | मुंबई विद्यापीठातील शिक्षकीय संवर्गाच्या बिंदुनामावलीस उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मान्यता मिळालेली असून रिक्त असलेली शिक्षकीय व शिक्षक समकक्ष पदे भरण्याकरिता मान्यता मिळणे बाबत. | शैक्षणिक मान्यता व गुणवत्ता हमी |
| ठराव | मुंबई विद्यापीठातील शिक्षकीय संवर्गाच्या बिंदुनामावलीस मान्यतेबाबतच्या पत्रास अनुसरून, त्यानुसार मुंबई विद्यापीठातील विविध विभाग आणि सर | |

| | | |
|---|---|---|
| | ज.जी.वास्तूशास्त्र महाविद्यालय येथील प्राध्यापक/ संचालक, ज्ञानस्रोत केंद्र (ग्रंथपाल), प्राचार्य / अधिष्ठाता, सहयोगी प्राध्यापक/ उपग्रंथपाल आणि सहायक प्राध्यापक/ ग्रंथपाल / सहायक ग्रंथपाल या संवर्गातील एकूण १५२ शिक्षकीय व समकक्ष पदे भरण्याबाबत व तसेच शासनाने मान्य केलेल्या शिक्षकीय पदांच्या संख्येनुसार विषयनिहाय व संवर्गनिहाय पदनिश्चिती मध्ये काही बदल असल्यास त्याबाबत बदल करण्याचे अधिकार संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठाता, मा. प्र-कुलगुरू व मा. कुलगुरूंना देण्यात आले. तसेच सदर पदभरती करताना सातव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार कलम ६.१ (I,II,III)व (a)(V) अन्वये निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने तीन तज्ञाचे (जे विद्यापीठाशी संबंधित नाहीत) नामनिर्देशित करण्याचे अधिकार या पूर्वी दिनांक १५ जुलै २०२३, रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतही (बाब क्र. २४ अन्वये) मा. कुलगुरूंना अधिकार दिले होते, त्याप्रमाणे आता सुद्धा मा. कुलगुरूंना अधिकार प्रदान करण्यात आले. | |
| ११ | निवडणूक कार्यक्रम संपेपर्यंत अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायी कर्मचाऱ्याप्रमाणे अतिकालीन भत्ता मिळणेबाबत. | निवडणूक विभाग |
| ठराव | सदर बाब मागे घेण्यात आली. | |
| १२ | अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीच्या पार पडलेल्या विविध बैठकीमध्ये पारित करण्यात आलेल्या २० तक्रारींचे आदेश व्यवस्थापन परिषदेतील सदस्यांना माहितीकरिता सादर करण्यात येत आहे. | तक्रार निवारण कक्ष |
| ठराव | सदर बाब मागे घेण्यात आली. तसेच यापुढे अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीचे आदेश व्यवस्थापन परिषदे समोर सादर न करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. | |
| १३ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 15th January, 2024 and to place item before Management Council. | I.P.E.M.D. |
| ठराव | It was resolved that Minutes of Building and Works Committee dated 15th January, 2024 be accepted. Department should maintain all records of Mumbai University's building wise maintenance register. | |
| १४ | मुंबई विद्यापीठातील रिक्त असलेली १. संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DoICT) २. मुख्य कार्यकारी अधिकारी ही पदे भरण्याबाबत. | मानव संसाधन विकास कक्ष - १ |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की मुंबई विद्यापीठातील रिक्त असलेली १. संचालक, माहिती व संदेशवहन तंत्रज्ञान विभाग (DoICT) २. मुख्य कार्यकारी अधिकारी ही पदे भरण्याबाबत नमूद केलेली शैक्षणिक अहर्तेनुसार मान्यता देण्यात आली. | |
| १५ | To read and approve the minutes of Finance and Accounts Committee | वित्त व लेखा |

| | | |
|---|---|---|
| | meeting held on 3rd February, 2024. | विभाग |
| ठराव | It was resolved that Minutes of Finance and Accounts Committee meeting held on 3rd February, 2024be accepted. | |
| १६ | देणगीदार ॲड. देवांश अ. मोहता यांनी या परीक्षेत मुंबई विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनीस "न्यायाधीश अनुप मोहता"यांच्या स्मरणार्थ सुवर्ण पदक देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव. | शिष्यवृती विभाग |
| ठराव | देणगीदार ॲड. देवांश अ. मोहता यांनी या परीक्षेत मुंबई विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनीस "न्यायाधीश अनुप मोहता"यांच्या स्मरणार्थ सुवर्ण पदक देण्याबाबत सादर केलेला प्रस्तावास मान्यता देण्यात आली. | |
| १७ | मुंबई विद्यापीठ आणि एमकेसीएल यांच्या मध्ये झालेल्या कराराची (MoU) मुदत दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ पासून वाढवून ३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत आवश्यक त्या सुधारणेसहित नविन करार करणेबाबत. | प्रवेश पात्रता व नोंदणी विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठ आणि एमकेसीए यांच्या मध्ये झालेल्या कराराची (MoU) मुदत दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ पासून वाढवून ३१ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत आवश्यक त्या सुधारणेसहित नविन करार करणेबाबत मान्यता देण्यात आली. | |
| १८ | विद्या परिषदेच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सभेमध्ये खालील बाब क्रमांक 6.1(N) Introduce B.Sc. (Bio-Technology Sem I-II) अन्वये पारित केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | विद्याविषयक प्राधिकरणे विभाग |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक २४ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या सभेमध्ये खालील बाब क्रमांक 6.1(N) Introduce B.Sc. (Bio-Technology Sem I-II) अन्वये पारित केलेला ठरावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. | |
| १९ | विद्यापीठाच्या विविध विभाग / संस्था येथे कार्यरत असलेल्या (शासनमान्य अर्थसहाय्यीत) शिक्षकांना आश्वासित प्रगती योजने अंतर्गत (CAS) पदोन्नतीसाठी गठीत केलेल्या छाननी व मूल्यमापन / निवड समितीच्या अहवालाबाबत. | शैक्षणिक मान्यता व गुणवत्ता हमी |
| ठराव | सदर बाब मागे घेण्यात आली. | |
| २० | Approval of report prepared for BWC items deferred in Management Council dated 20th November, 2023. | I.P.E.M.D. |
| ठराव | It was resolved that Minutes of Building and Works Committee dated 20th November, 2023 of Item no.4,7,8,9 and 10 be accepted. | |
| २१ | A approval for designation IDOL, University of Mumbai as Centre for | IDOL |

| | | |
|---|---|---|
| | Distance and Online Education (CDOE) | |
| ठराव | According to UGC DEB Management Council grant the approval for designating IDOL as **Centre for Distance and Online Education (CDOE).** | |
| २२ (On Table Item) | व्यावसायिक महाविद्यालयांच्या प्रस्तावांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | विद्या परिषदेच्या दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२४ रोजी बाब क्र २.१ अन्वये पारित केलेल्या ठरावास मान्यता देण्यात आली. | |
| २३ (On Table Item) | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता व्यवस्थापन व संगणक अनुप्रयोग (BBA-BMS-BCA) या अभ्यासक्रमाच्या प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची अधिसूचना याबाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | सदर बाब अधिष्ठाता मंडळा समोर ठेवण्यात यावी, असे ठरले. | |
| २४ (On table Item) | एस.एस.टी. महाविद्यालय, उल्हासनगर, ठाणे या महाविद्यालयाची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२० (१) अन्वये संलग्नता रद्द करणे बाबत. | महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की सदर बाब विद्यापरिषदे पुढे सादर करण्यात यावी. | |
| २५ | Career growth of Ms. Kavita Pandey, Placement Officer at Alkesh Dinesh Mody Institute for Financial Management Studies. | शैक्षणिक नेमणूक व गुणवत्ता हमी |
| ठराव | अल्केश दिनेश मोदी वित्तीय व व्यवस्थापन अभ्यासक्रम संस्था येथील प्लेस मेन्ट ऑफिसर कु. कविता पांडे ह्यांच्या विनंती अर्जानुसार गठीत समितीचा अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात आला. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू